# चैतन्य लहरी

जानेवारी-फेब्रुवारी २००५
अंक क्र. १, २



# ख्रिसमस पूजा, २००४





# अनुक्रमणिका


- ....सहजधर्माचा न पडो विसर ---------------------------------------- २
- संक्रांती पूजा, प्रतिष्ठान, पुणे दिनांक १४ जानेवारी २००५ (वृत्तांत) ---- ३
- प.पू.श्रीमाताजींचा उपदेश ------------------------------------------ ४
- श्रीसूक्त -------------------------------------------------------- ६
- चैतन्य लहरी आणि आत्मविश्वास---------------------------------- ८
- ख्रिसमस पूजा २००४, बालेवाडी पुणे ( वृत्तांत) ----------------------- ९
- सहज समाचार ----------------------------------------------------- १४
- वनदेवी आयर्वेदि हेल्थ प्रॉडक्टस प्रा.लिमीटेड ---------------------- २०


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटों, कॅलेंडर, चैतन्य लहरी व युवादृष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था ''निर्मल इंन्फ्रोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणें'' या कंपनी मार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,निर्मल इंन्फ्रोसिस्टीमस ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करु नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील. तसेच चैतन्य लहरी मासिकाचे नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD." या नावाने पाठवावा. सदर कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.


NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,
KOTHRUD,PUNE 411 O29. TEL. 020 25286537

# सहजधर्माचा न पडो विसर

प.पू.श्रीमाताजींच्या कृपेनें कुण्डलिनी जागृत होऊन आत्मसाक्षात्काराची अनुभूती आपल्याला मिळाली ही आपल्या आयुष्यामधील फार महद्‌भाग्याची घटना आहे. सहजयोग प्राप्त झाला हे वरदान मिळाले अशी ही कृपा आहे. अर्थात या मार्गावर सतत चालत राहून आत्मसाक्षात्काराचे पूर्ण वैभव प्राप्त करून घेणे, हेच ते उपकार फेडणे आहे. एका प्रवचनांत श्रीमाताजी म्हणाल्याच होत्या की, "Now that you have known the spirit, you must become the spirit.... -तुम्ही आत्म्याला जाणले आहे म्हणून आता तुम्ही आत्मा बनले पाहिजे."

ही सर्व अंतरंगात घटित होणारी घटना असल्यामुळें त्या प्रगतिपथावर सतत अवधान राखले पाहिजे व प्रगतीकडेच सतत अवधान राखले पाहिजे. याच तळमळीने ध्यास घेतला तर अंतरंगात हे बदल होत असल्याच्या खुणा आपल्या आपल्यालाच मिळत राहतात व ध्यानामधून त्या जाणवत राहतात.

आत्मा बनणे म्हणजे संत बनणे असे म्हटले तर चुकीचे ठरू नये. श्रीमाताजीही सहजयोग्यांना संत म्हणतात. अर्थात संतांचे गुण आपल्या व्यक्तिमत्त्वात उतरले पाहिजेत व त्यांचा आविष्कार आपल्या जीवनामधून झाला पाहिजे. संतांचे गुण म्हणजे शांती, समाधान, समभाव, निरासक्तता, नम्रता, निरभिमान, स्थितप्रज्ञता, दया, क्षमा, करूणा, प्रेम इत्यादी गुणांचा अभाव आपल्या वागण्यातून बोलण्यातून, विचारातून होत तर नाहीं ना हे तपासणे हेच आत्मपरीक्षण; त्यांत सुधारणा करण्याचा सावधपणें प्रयत्न करणे हा सहजधर्म. या धर्माचे प्रतिपालन करणें व तो आपल्या जीवनांत रुजवणे हे आपलेच कर्तव्य व जबाबदारी आहे. त्याचा अभ्यास सतत करत राहिले पाहिजे. त्याचा प्रसार योग्य वेळ येईल तेव्हां व योग्य त्याप्रकारे मिळणारच आहे. त्या कृपेची आपण फक्त प्रतीक्षा करत असावे. हीच सहजयोग्यांची निष्ठा व हेच सहज- जीवन.

म्हणून आपण हृदयापासून सतत प्रार्थना करू या :

माते असा आता करी उपकार ।
सहजधर्माचा मज न पडो विसर ॥

●●●

# संक्रांती पूजा, प्रतिष्ठान, पुणे

## दिनांक १४ जानेवारी २००५ (वृत्तांत)

प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवींची संक्रांतीच्या दिवशी पूजा प्रतिष्ठान मध्ये दिनांक १४ जानेवारी २००५ रोजी रात्री ९:३० च्या सुमारास अल्पशा स्वरूपात संपन्न झाली. पूजेची तयारी सकाळपासूनच सुरू होती. दुपारपासूनच फुलांच्या डेकोरेशनच्या परडया सजविण्याचे काम चालू होते. त्यामध्ये मोठया आकाराचे गुच्छ तयार करण्यात आले होते.तसेच सुगंधी चाफ्याच्या फुलांचा वापर करून फुलांची परडी सजविली होती. त्याच्यामध्ये सजावटीने मेणबत्त्या लावलेल्या होत्या. तसेच एका मोठ्या परडीमध्ये वेगवेगळ्या प्रकारची फळे मांडून त्याची आकर्षक सजावट केली होती. तसेच संक्रांतीच्या सर्व भाज्या असलेली (ववसा) सुंदर मोठी परडी सजविली होती. अनेक प्रकारचे गुच्छ तयार केले होते.

साधारण ८:०० च्या सुमारास सर्व सजविलेले साहित्य प्रतिष्ठानमधील श्रीमाताजींच्या आरामकक्षाबाहेरच्या दालनात ठेवण्यात आले. त्याच्यासोबत सर्व प्रकारची मिठाई तसेच वेगवेगळ्या बाऊल्स मध्ये ड्रायफ्रुट भरून त्याची आकर्षक रचना केली होती. तसेच संक्रांतीच्या तिळगुळाचा वापर करून सर्व आभूषणं तयार केलेली तबके सजविलेली होती. दोन-तीन तबकात गुलाबांच्या पाकळ्या व पिवळ्या चाफ्यांच्या फुलांचा वापर करून आकर्षक रचना केली होती.एका तबकात आदिशक्तीसाठी अनेक साडया ठेवल्या होत्या.

साधारण ९.०० च्या सुमारास श्री पापाजींनी आरामकक्षातून बाहेर येऊन सदरचे साहित्य आदिशक्तीच्या समोर मांडण्याबाबत परवानगी दिली. सर्व साहित्याची मांडणी श्रीमाताजींच्या आरामकक्षेत त्यांच्यासमोर युवाशक्तीच्या मुलांनी केली. त्यावेळी श्रीमाताजी व सर समोर कोचावर बसून त्याचे कौतुकाने निरीक्षण करत होते. त्यावेळी श्रीमाताजी अत्यंत प्रसन्न दिसत होत्या.

साधारण ९:३० च्या सुमारास ट्रस्टी श्री राजेंद्र पुगालिया, श्री पराग राजे यांनी श्रीमाताजींच्या आरामकक्षात प्रवेश करून श्रीमाताजींच्या कमलचरणावर सर्व जगातील सहजयोग्यांच्या वतीने सुगंधी पिवळ्या चाफ्याचा हार अर्पण केला. श्रीमाताजींनी संक्रांतीच्या पूजेचा स्वीकार करून सर्व जगातील सहजयोग्यांना आशीर्वादित केले.श्रीमाताजींना संक्रांतीची साडी व एका सुंदर सजविलेल्या बाऊलमध्ये कोवळ्या हरबऱ्याचे हिरवे हिरवे दाणे श्री राजेंद्र पुगालिया यांनी सादर केले असता त्यांनी त्यातले काही दाणे तोंडात टाकले. त्यावेळी श्रीमाताजी त्यांच्या समोर मांडलेल्या असंख्य फुलांच्या, फळांच्या तसेच नैवेद्याच्या प्रकारांचे कौतुक करीत म्हणाल्या की, '' हे केवढे असंख्य मांडले आहे याची संख्या कळण्यासाठी याला नंबर द्यायला हवे होते.तसेच या सर्वांचे फोटो काढा.'' त्यावेळी पापाजी म्हणाले,'' सर्व सहजयोग्यांना दाखविण्यासाठी याचे फोटो काढा. त्यानंतर सर्व उपस्थित सहजयोग्यांना पापाजींनी श्रीमाताजींच्या पुढच्या बाजूला बसण्यास सांगितले. सर्वांना श्रीमाताजींनी अनंत आशीर्वाद दिले. प्रत्यक्ष पूजेचा सोहळा साधारण १५-२० मिनिटांचा झाला. कार्यक्रम संपल्यानंतर श्रीमाताजींनी व पापाजींनी प्रसादातील गाजर हलवा घेऊन प्रसादाचा स्वीकार केला.

त्यानंतर आलेल्या सर्व पाहुण्यांना प्रतिष्ठानमध्ये असलेल्या सहजयोगी भगिनींनी तयार केलेल्या पुरण-पोळीचा महाप्रसाद देण्यात आला. सदर पूजासोहळ्याच्या कालावधीत सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवत होते.

●●●



सहजयोग्यांना आपण चैतन्यमय आहोत याची जाणीव हवी. आपण जन्मल्यानंतर फक्त सुख साधनेचाच विचार करतो. आपले वास्तव्य व कर्तव्य काय आहे ह्या विषयांतच मशगुल असतो. परंतु हा दृष्टिकोन सोडून चैतन्याबद्दल जेव्हा विचार करू लागतो, तेव्हा त्या जड वस्तू सुद्धा चैतन्यमय होतील असे वातावरण आपण तयार केले पाहिजे.

ही गोष्ट समजणे अत्यंत कठीण आहे व थोडेच लोक जाणू शकतात. उदा. माझ्याकडे गणेशाचा फोटो दाखवून मी याची पूजा करू शकतो का? अशी विचारणा करण्यात येते. प्रथम आपण त्यापासून चैतन्य-लहरी येतात कां नाही? हे तपासून पहावे. दुसरे उदा. समजा तुम्हाला नवीन घर घ्यावयाचे आहे, त्यावेळी त्या वास्तूपासून चैतन्य येते किंवा नाही? याचा तपास घ्यावा. आपण दुसऱ्या गोष्टी म्हणजे आराम, सुख व आवडी-निवडीचा विचार करतो. परंतु त्याच्या चैतन्याचा कधीच विचार करीत नाही. पण आपण त्या चैतन्याकडे आकृष्ट व्हावयास हवे. म्हणजे जड वस्तूमध्ये देखील चैतन्याचा अंश असतो हे आपणास कळून येईल.

एकदा या चैतन्य शक्तीची जाणीव झाली म्हणजे ती आपल्या अंतरंगांत कार्य करू शकते व आपण आपली प्रकृती, मन, अहंकार, प्रतिअहंकार आणि प्रत्येक गोष्ट आत्मप्रकाशांत उजळून आत्मिक बळावर ती पाहू शकतो.

प्रथम नकारात्मक गोष्टीचा प्रभाव डाव्याबाजूवरच्या स्वाधिष्ठान चक्रावर दिसून येतो. कारण तेच कुंडलिनीच्या स्थाना-नंतरचे चक्र आहे. वस्तुत: डावे स्वाधिष्ठान चक्र हे गणेशाच्या अंकित आहे. गणेश ही देवता जन्म-मृत्यूच्या फेऱ्यावर लक्ष ठेवते. म्हणूनच गणेशजी आपली संतुलनता व विवेक यांचा नाश होऊ देत नाही. परंतु ही नकारात्मक भूमिका आपल्या चुकीच्या इच्छेनुसार, जडवस्तूंच्या अभिलाषेतूनही येऊ शकते.म्हणून आपण आपल्या गरजा सीमित ठेवाव्या. त्यामुळे आपण त्यांच्या आहारी न जाता सुखी जीवन जगू शकतो. कारण आपण भूत व भविष्य काळातील विचार सोडून देतो व आपण आपल्या डाव्या मणिपूर चक्रातून ह्या जड वस्तूंचा जो हव्यास सुरू होतो तोच आपण थांबवतो. कारण 'काळ' ही जड वस्तू आहे व आपण तिचा विचारच सोडून देतो.

आपले सगळे लक्ष आत्म्यावर केंद्रित केले की, डाव्या नकारात्मक गोष्टींचा प्रभाव कमी होतो. आपला आत्मा आनंदित असेल तरच आपल्यातून चैतन्य वाहू लागेल. आपले चित्त जड वस्तूपासून दूर नेल्यास आपल्याला डाव्या नकारापासून संरक्षण मिळेल. आपण नेहमी आपली दृष्टी मध्यातूनच ठेवावी म्हणजे आपणास नको असलेले दिसणार नाही व प्रयत्नही करणार नाही.

सहजयोगांत काही गोष्टी निषिद्ध मानलेल्या आहेत. उदा. आपण कोणाचेही पाय धरू नये. तसेच सहजयोग्याने देखील कोणालाही स्वत:चे

प.पू.श्रीमाताजींचा उपदेश

निर्मल योग १९८३ खंड
क्रमांक ३-१५ पा. १४-१५

पाय धरू देऊ नये. हे सहजयोग्यांसाठी एक मोठे बंधन आहे असे मानावे. जे कोणी पाय शिवतील त्यांचे चैतन्य नाहीसे होईल वा जे पाय शिवून घेतील त्यांनादेखील हृदय चक्रावर पकड येईल.

आपल्या सर्वांचा सारखाच उद्धार होत असतो. आपण एका व्यक्तीचेच अंग व प्रत्यंग आहोत. ह्यात उच्च नीचतेचा भाव येतच नाही. एखाद्याला असे वाटते, की हा भाव लवकर कमी होईल. पण तसे न होता ही डावीकडील बंधनाची भावना आहे. म्हणून प्रत्येकाने प्रगल्भ इच्छा बाळगावी, की आपल्या सर्वांना आत्मसाक्षात्कार व्हावा. आपण जेवढ्यांना पार करता येईल त्यांना पार करावे. आपली स्वत:ची जेवढी शक्यता असेल तेवढी प्रगती करून घ्यावी व आपण अनंत आशीर्वादाला पात्र व्हावे.

विचार डाव्याबाजूने सुद्धा येऊ शकतो. जर भूताची बाधा तुमच्या डोक्यात असेल तर ते असे विचार देऊ शकतील,तू तर नालायक तुझा काही उपयोग नाही अश्या वेळी आपण आपली उजवी बाजू उचलून डावीकडे बंधन द्यावे.हे आपण असे कां करतो? कारण उजव्या बाजूने आपणास आशीर्वाद मिळतात ते आपण डावीकडे पाठवितो. ज्या लोकांना डावीकडील बाधा असते त्यांनी हा प्रकार करावा म्हणजे त्यांचे त्याबद्दल विचार येणार नाहीत. अशावेळी आपले नांव जमिनीवर काढून त्याला बंधन देऊन जोडेपट्टी करणे चांगले. आपण आनंदात राहून परमेश्वराचे चांगले ध्यान करावे व परमेश्वरास सांगावे की, मी आनंदी आहे, कारण मला पाहिजे ते मिळाले आहे.

उजव्या बाजूलादेखील स्वाधिष्ठान चक्रावर पकड येऊ शकते. कारण आपण विचार करतो. त्यामुळे त्या चक्रावर पकड येते. विचार मग तो डाव्या वा उजव्या बाजूचा असला तर तो तुमच्या लिव्हरवर परिणाम करू शकतो व दोन्हीकडून आल्यास त्याचा परिणाम फार तीव्रतेने जाणवतो.

म्हणून सहजयोग्याने नेहमी सतर्क रहावयास हवे. आपण आपला तोल घालवता कामा नये. दोन्ही बाजूकडे न धावता आपण मध्यातच रहाणे म्हणजे आपण 'निरिच्छ' भावनेत असतो. एखाद्या बाबीत विरून जाणे वा त्याची माहिती घेणे यात फरक आहे. म्हणून आपण आपल्यालाच सांभाळून घेतले पाहिजे.

चैतन्याला या सर्व गोष्टींची जाण असते. म्हणून तुम्हाला त्याचे जर ज्ञान झाले तर आपण एक चांगले सहजयोगी झालात असे समजावे.

जर हृदय चक्रावर बाधा असेल तर त्या इसमाची प्रगती खुंटते. हृदय हे प्रकाशाचे उगमस्थान आहे. तेथूनच ब्रह्मशक्ती निर्माण होते व तेथेच आत्मा वास करतो. आपल्या हृदयात जर चैतन्य नसेल तर आपण आपली प्रगती कशी करू शकाल?

आपण काय निवडावयाचे याचे ज्ञान आपणास हवे. सहजयोगामुळे ते साध्य होऊ शकते व आपणास तेथेच परिपक्वता येते. हीच सहजयोगातील आपली उन्नती. आपण आता दुसऱ्या कोणालाही त्याबद्दल न विचारलेले बरे.

हा उन्नतीचा मार्ग आपण स्वीकारावा व आपणास त्याचे संपूर्ण ज्ञान हवे म्हणजेच आपणास खरे काय ते कळेल व मला सुधारून कसे घेता येईल?. मला 'मी'म्हणजे काय ते कळावयास हवे. तो म्हणजे माझा 'आत्मा'आहे. माझा 'अहंकार'नव्हे. तदनंतर अहंकार व प्रतिअहंकाराला थाराच मिळत नाही व आत्माच त्याला ज्ञान देऊ शकतो.

परमेश्वर आनंद उपभोगत असतो तर आपण नसतो. आपण त्याच्या चरणी लीन व्हावे व आपण नेहमी म्हणत रहावे, की परमेश्वराने मला निर्माण केले हाच माझा खरा मोठा आनंद आहे. त्याने आपणास चैतन्यमय जीवन प्रदान केले, आहे व त्यामुळेच आपणास त्याच्या प्रेमाची प्रचीती येते व त्यांनी आपणाकरिता किती कष्ट सोसले ते व आपणास ह्या स्थितीला आणून ठेवले तेही कळून येते.

परमेश्वराने जे तुला दिले ते तू दुसऱ्याला दे व त्यातच आनंद मान व त्यांचे जीवन सुखमय कर व असे जर केले तर तुझ्या दोन्ही बाजूची पकड एकदम सुटेल व तू चैतन्यमय होशील.

● ● ●

# श्रीसूक्त



''श्रीसूक्त '' हे ऋग्वेदातील अंतिम कालातील सूक्त आहे. श्री म्हणजे लक्ष्मी आणि सूक्त म्हणजे चांगले बोलणे. तेव्हां लक्ष्मीविषयी चांगले वर्णन, यथार्थ वर्णन म्हणजे श्रीसूक्त होय.

अशा या अमृतमयी श्रीसूक्तातील एक-एक श्लोकाचा अर्थ पाहू या. प्रत्येक श्लोकामधून, अमृतरसप्राशनाचा आनंद व तृप्ती आपण अनुभवतो.

हरिः ओम् हिरण्यवर्णां हरिणीं सुवर्णरजतस्रजाम् ।
चन्द्रां हिरण्यमयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ॥१॥

विवरण :- या मंत्रात अग्नीला उद्देशून, लक्ष्मीसंबंधी प्रार्थना केली आहे. अग्नी हा देवतांना बोलावतो ही एक सत्य अशी वस्तुस्थिती आहे. अग्नी ही एक स्वयंपूर्ण शक्ती आहे. अग्नी हा गतिशील असल्यामुळे तो साधकाला उन्नतीच्या मार्गावर पुढे पुढे नेणारा असतो. म्हणूनच आपणही श्रीमाताजींच्या फोटोसमोर निरांजन समई-मेणबत्ती लावून ज्योतीला आमंत्रीत करतो. तिची पूजा करतो. या दिव्याच्या ज्योतीमध्ये वातावरणातील सर्व वाईट गोष्टी निष्प्रभ करण्याची (नाहीश्या करण्याची )प्रचंड शक्ती असते.

ज्या लक्ष्मीमातेला आमच्यासाठी बोलव अशी अग्निदेवतेला आम्ही प्रार्थना करीत आहोत, ती लक्ष्मीमाता आहे तरी कशी?

जिची कांती सुवर्णासमान आहे, जिच्या शरीरातून चैतन्य ओसंडून वाहत आहे (ज्यामुळे सर्वांना प्रसन्न वाटते.)जिच्या गळ्यामध्ये सोन्या-चांदीच्या माळा शोभून दिसत आहेत, जिचे मुखकमल चंद्राप्रमाणे शांत व शीतल आहे, अशी ही लक्ष्मीमाता वातावरणात सतत चैतन्यरूपी अमृतबिंदूंचा वर्षाव करीत असते. त्यामुळेच सर्व सृष्टी तृप्त व प्रसन्न होते. धरतीमाता हिरवीगार शाल पांघरते. (समृद्धीचे लक्षण)जिचे संपूर्ण शरीरच, सुवर्णमयी तेजाने घडलेले आहे, अशा लक्षणांनी युक्त असलेल्या लक्ष्मीमातेला तू आमच्या साठी बोलव.

तां म आवह जातवेदो लक्ष्मीमनपगामिनीम् ।
यस्यां हिरण्यं विन्देयं गामश्वं पुरुषानहम् ॥२॥

विवरणः- हे अग्निदेवा, वरच्या श्लोकात वर्णन केलेल्या लक्ष्मीमातेला माझ्यासाठी बोलव. मला अनश्वर असे ऐश्वर्य मिळू दे.

लक्ष्मीमाता ही सुख-समृद्धी देणारी. सुख-समृद्धी आली, तरी आपली भौतिक, ऐश्वर्याची लालसा ही न संपणारीअसते. म्हणूनच आपण तिच्याकडे काय मागायचे? तर आम्हाला आध्यात्मिक ऐश्वर्य मिळू दे. जेव्हा आपल्याला आध्यात्मिक ऐश्वर्यामुळे तृप्ती मिळते, समाधान मिळते, आनंद मिळतो, तेव्हां आपली सदसद्विवेकबुद्धी, जागृत होते. त्यामुळे आपल्याला मिळणाऱ्या भौतिक ऐश्वर्याचे मार्ग, रस्ते स्वच्छ होतात. अशा स्वच्छ मार्गांवरून

येणारी समृद्धी ही चिरकाल टिकणारी असते.

अशा आध्यात्मिक ऐश्वर्याचा निरंतर वास असल्यावर तेथे शारीरिक, मानसिक आरोग्यही येणारच. त्यासाठी आमचा ओढा हा फक्त <u>शाश्वत</u> गोष्टींकडेच राहू दे. या जगात शाश्वत असे काय आहे?तर <u>आईचे प्रेम</u> ही एकच शाश्वत अशी गोष्ट आहे.

म्हणूनच आपल्या सर्वांच्या आईच्या चरणी, म्हणजेच श्रीलक्ष्मीस्वरूपा - श्रीमाताजींच्या चरणी, अशा शाश्वत सुखाची प्रार्थना आपण सर्वांनी करू या. हे शाश्वत सुख म्हणजेच <u>अनश्वर ऐश्वर्य.</u>

अश्वपूर्वां रथमध्यां हस्तिनादप्रबोधिनीम् ।
श्रियं देवीमुपह्वये श्रीर्मा देवीर्जुषताम् ॥३॥

सैन्यरूपी लक्ष्मीमातेचे वर्णन या श्लोकात केले आहे. ज्या सैन्यात सर्वात आधी घोडे, त्यानंतर मध्यभागी रथ चालत आहेत, हत्तींचा चीत्कार होत आहे. यामुळे एकप्रकारचे सामर्थ्य ज्या सैन्यात निर्माण होते, असे सैन्यरूप धारण करणाऱ्या लक्ष्मीमातेला आम्ही बोलवत आहोत. माझ्या घरी अश्या लक्ष्मीमातेचा निवास असो.

''श्री '' म्हणजे लक्ष्मी. या चराचरसृष्टीतील प्रत्येक अणु-रेणू हा श्रीलक्ष्मीमातेच्या तेजाने, चैतन्याच्या प्रभेने व्यापलेला आहे. म्हणूनच त्यामध्ये जिवंतपणा, रसरशीतपणा येतो. निसर्गाचा सुंदर आविष्कार हे त्याचेच उदाहरण होय. अशी ही ''श्री'' आपल्यातही आहेच. म्हणूनच आत्म्यालाही आत्मश्री असे म्हटले जाते. आपल्या शरीराच्या या विशाल रथात, आत्म्याची स्वारी डौलाने विराजमान झाली आहे. या रथाला जोडलेले अश्व(घोडे) म्हणजे एकादश इंद्रिये. ---पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, एक मन. या अकरा अश्वांनी सुसज्ज केलेल्या रथात आत्मा हा रथी आहे. हृदयाच्या आसनावर तो विराजमान होतो. असे हे आत्मश्रीचे सैन्यरूपातले वर्णन.

तेव्हा आपल्यात असणारी आत्मज्योत हीच आत्मलक्ष्मी आहे. अशी ही आम्हा प्रत्येकात असणारी आत्मज्योतरूपी आत्मलक्ष्मी निरंतर प्रकाशू दे.

या शरीरस्थ आत्मज्योतीवर अधूनमधून अज्ञान, कुविचार यांची काजळी येते. ती झटकून टाकण्यासाठीच आम्ही या मंत्राने श्रीमाताजींना प्रार्थना करीत आहोत.

अशी ही लक्ष्मीमाता आमच्या घरी येऊ दे. याचा अर्थ, आमच्या हृदयाच्या घरामध्ये लक्ष्मीमातेचे वास्तव्य असू दे. म्हणजेच, <u>श्रीमाताजी, आम्हा प्रत्येक सहजयोग्याच्या हृदयरूपी घरामध्ये सदैव आपले वास्तव्य असू दे.</u>

कां सोस्मितां हिरण्यप्राकारामार्द्रां
ज्वलन्तीं तृप्तां तर्पयन्तीम् ।
पद्मे स्थितां पद्मवर्णां तामिहोपह्वये श्रियम् ॥४॥

विवरण :- जिचे स्वरूप अवर्णनीय आहे, जी शक्तिस्वरूपा आहे, जी नेहमी स्मितहास्य करते, जी स्वत: सुवर्णाप्रमाणे देदीप्यमान आहे, जिचे हृदय करुणासान्द्र आहे, करुणारूपी अमृताचा वर्षाव ती सतत भक्तांवर करते. समुद्रातून प्रगट झालेली असल्यामुळे जी आर्द्र आहे आणि तरीही तिच्यातून सतत तेज बाहेर पडत आहे. (पाणी आणि तेज दोन्ही एकत्र) ती सदैव तृप्त आणि प्रसन्न असून भक्तांचे मनोरथ पूर्ण करते. जी नेहमी कमळात राहते, जिची कांतीसुद्धा कमलाप्रमाणे आहे अशा लक्ष्मीमातेला आम्ही बोलावतो.

लक्ष्मीमातेचे निवासस्थान म्हणजे कमलपुष्प. कमळ हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे. सहस्रदलचक्र हे देखील सहस्त्र पाकळ्यांच्या कमलपुष्पाप्रमाणेच असते. अशा या सहस्रदलकमलाच्या आसनावर श्रीमाताजींचे स्थान आहे. अश्या <u>या कमलासनस्थित असलेल्या आपल्या सर्वांच्या माउलीच्या चरणी आम्हा सर्व सहजयोग्यांचे कोटी कोटी प्रणाम!</u>

चन्द्रां प्रभासां यशसा ज्वलन्तीम्
श्रियं लोके देवजुष्टामुदाराम् ।
तां पद्मिनीमीं शरणमहं प्रपद्ये अलक्ष्मीर्मे नश्यतां त्वां वृणे ॥५॥

विवरण :- जी चंद्राप्रमाणे तेजस्वी, शांत, आल्हाद देणारी अत्यंत कांतिमती, त्रैलोक्यात प्रसिद्ध असणारी आहे, इन्द्रादी देवदेखील जिची सेवा करतात, जी उदार आहे, जी कमलाकार आहे, विष्णुपत्नीस्वरूप आहे, अश्या या लक्ष्मीमातेला आम्ही शरण आलो आहोत.

हेलक्ष्मीमाते, आमचे भौतिक दारिद्र्य आणि मानसिक दारिद्र्य नाश पावू दे. आम्ही षड्रिपूंच्या अधीन होतो. त्यामुळे असंतोष निर्माण होतो. असंतोषात सर्वनाश असतो. असुरी वृत्तीचे म्हणजेच आमच्यातील वाईट वृत्तीचे निर्मूलन होऊ दे. आमचे चित्त इकडे तिकडे भरकटून नको त्या गोष्टीमध्ये अडकून आम्ही आमच्या कर्मांनीच आमचे नुकसान करून घेतो. म्हणून हे माते, आमच्यातील दोषरूपी अंधकार नाहीसा कर. आमच्यातील सद्भाव जागृत होऊ दे. आमचे चित्त स्थिर, अविचल राहू दे. दैवी गुणांची इच्छा आम्हाला होऊ दे. अक्षय्य सुखाची आकांक्षा असू दे आणि अशा खऱ्या अविनाशी ऐश्वर्याची जेव्हा प्राप्ती होते, तेव्हां ती शक्ती, आतून बाहेरून अविरत आनंद निर्माण करते. अश्या या भाग्यलक्ष्मीची मागणी म्हणजेच दैवी संपत्तीची प्रार्थना आम्ही करीत आहोत.

श्रीमाताजी, आमच्यामध्ये असणाऱ्या सर्व वाईट वृत्तींच्या पाशातून आम्हाला मुक्त करा. म्हणजे, आपल्या चरणकमलातून अविरत पाझरणाऱ्या चैतन्यरूपी अमृताचे प्राशन आम्ही करू शकू. - जय श्रीमाताजी

● ● ●

## चैतन्य लहरी आणि आत्मविश्वास

### निर्मलयोग १९८३ खंड क्रमांक १३

आपल्याला आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर चैतन्य लहरींची जाणीव ही अत्यंत दुर्मीळ अशी देणगी दिलेली आहे. आपले निर्णयाचे क्षेत्र विस्तृत होऊन आपल्यापुढे अपार क्षितिजे निर्माण होतात.आपली 'नीर-क्षीर'न्यायवृत्ती प्रगल्भीत होते व निर्णयाबद्दल आपला विश्वास वाढतो. आपण अंधकारातून प्रकाशाकडे येतो व अनिश्चिततेपासून निश्चितता लाभते. चैतन्यलहरीमुळेच योग्य व रास्त मार्गाचे अवलोकन होते.

परंतु ह्या शक्तीचा दुरुपयोग केला तर ती (आपणास मिळालेली शक्ती) लुप्त पावते. त्यामुळे आपण आपला आत्मविश्वास गमावतो व पर्यायाने सहजयोगावर ठपका ठेवतो.ही शक्ती जर आपण अंत:करणापासून वापरली तर तिचे उत्तर आपणास मिळते.कारण तिचा उगम परमेश्वरी शक्तीशी असतो. या घटनेमुळे निर्णय घेण्याची वृत्ती व आत्मबल यावर व्यक्तीचा आत्मविश्वास दृढावतो.

एखादी घटना घडल्यावर कारण शोधणे वा निर्णय घेणे व तो अमलांत आणणं यांच्या अंतिम वेळी आपल्या निर्णयावर आपला विश्वास नसल्यामुळे आपण कच खातो. आपला आत्मविश्वास गमावल्यामुळे आनंद मावळतो. कारण ही कृती व दैवी शक्ती यांचा संबंध नसतो.

तथापि आपले चित्त श्रीमाताजींच्या चरणी ठेवल्यास आपणास त्या शक्तीची जाणीव होईल. उदा. लहान पाखरासारखी आपली अवस्था आहे. ते उडण्याचा प्रयत्न करते पण आत्मविश्वास नसल्यामुळे ते परत घरटी येते. अंतिमत: प.पू.श्रीमाताजींच्या कृपेने स्वत: आकाशात भरारी मारण्यास समर्थ होते.

अशाच प्रकारे आपण प.पू.श्रीमाताजींच्या प्रेमळ संगोपन, सुज्ञ मार्गदर्शन व अपार करुणेच्या जोरावर भरारी मारण्यास समर्थ होतो, आपण बलवान होऊन सत्याला सामोरे जाऊ शकतो.

# २४ डिसेंबर २००४, प्रतिष्ठान













# २५ डिसेंबर २००४, बालेवाडी








# २६ डिसेंबर २००४, प्रतिष्ठान













# १४ जानेवारी २००५, प्रतिष्ठान















# ख्रिसमस पूजा २००४, बालेवाडी पुणे (वृत्तांत)

या वर्षीची ख्रिसमस पूजा प्रथमच पुण्यात दिनांक २४,२५ व २६ डिसेंबर २००४ या कालावधीत आयोजीत केली होती. बालेवाडी स्टेडियमवर दिवसभरातील कार्यक्रमासाठी बॅडमिंटन हॉल व संध्याकाळच्या कार्यक्रमासाठी मुख्य स्टेडियमवर स्टेज घालून व्यवस्था केली होती. तसेच परदेशी सहजयोग्यांसाठी बालेवाडीतील सर्व इमारतीतील अद्ययावत खोल्यांमध्ये राहण्याची सोय व जेवणाची सोय टेबल-खुर्च्यांसह अद्ययावत असलेल्या कॅन्टीनमध्ये केली होती. तर भारतीय सहजयोग्यांसाठी राहण्यासाठी बालेवाडी परिसरात मोठमोठे तंबू बांधून राहण्याची व्यवस्था केली होती.जगभरातील सर्व भागातून सहजयोग्यांचे स्टेडियममध्ये दिनांक २३ डिसेंबर पासूनच आगमन सरू होते.

दिनांक २४ डिसेंबर २००४

सकाळची सुरूवात बॅडमिंटन हॉलमध्ये सकाळी ७:०० वा. सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर १० च्या सुमारास त्याच ठिकाणी महाहवन सुरू झाले. अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सर्व साहित्याची पाहणी करून त्याची योग्य ठिकाणी मांडामांड करुन हवनाची तयारी पुणे युवाशक्तीने केली होती. समोर स्टेजवर प.पू.श्रीमाताजींच्या फोटोभोवती आरास केली होती.साधारण १०:४५ च्या सुमारास सर्व स्टेट लिडर्स यांना हवन कुंडाजवळ आमंत्रित केले.

सुरूवातीला सामूहिक बंधने घेऊन तीन महामंत्र घेतले. सर्वांनी संतुलनात येण्यासाठी उजवा हात जमिनीवर व डावा हात आकाशाकडे करून मंत्र म्हटला. त्यानंतर गणेशमंत्र व अथर्वशीर्ष म्हणत असताना हवन-कुंडात दूर्वा वाहण्यात आल्या. त्यानंतर हवन कुंडात फुलांच्या पाकळ्या वाहण्यात आल्या.त्यानंतर कुंजिका स्तोत्र म्हणण्यात आले. अग्नीचा मंत्र म्हणत असताना श्री पुगालिया यांच्या हस्ते हवनातील अग्नी प्रज्वलीत करण्यात आला. त्यानंतर प.पू.श्रीमाताजींची १०८ नावे घेण्यात आली. त्यानंतर श्रीपुगालिया यांच्या हस्ते हवनात पूर्णाहुती देण्यात आली. शेवटी श्रीमाताजींची आरती होऊन हवनाचा कार्यक्रम दुपारी १२:३० च्या सुमारास संपन्न झाला. संपूर्ण हवनाचे पौरोहित्य अत्यंत श्रद्धेने सर्व विधींसह व्यवस्थितपणे श्री महेश मोकाशी यांनी पाहिले.

हवनासाठी बॅडमिंटन हॉलमध्ये प्रचंड सहजयोगी जमले होते.हवनानंतर सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवत होते. त्यानंतर श्री राजेंद्र पुगालिया यांनी जमलेल्या सर्व सहजयोग्यांचे स्वागत केले ते म्हणाले की, प.पू.श्रीमाताजींच्या कृपेत पूजेसाठी प्रचंड संख्येने सहजयोगी जमले आहेत. यापूर्वी कोणत्याही पूजेसाठी एवढया प्रचंड संख्येने सहजयोगी जमले नव्हते. सर्व सहजयोग्यांना सर्व सोयी मिळाव्यात यासाठी मॅनेजमेंट प्रयत्न करीत आहे. तरी सुद्धा आपल्याला काही सूचना, मार्गदर्शन करावयाचे असल्यास आपण सर्वत्र बॉक्सेस ठेवलेले आहेत, त्यात आपले विचार टाकावेत. तसेच या सेमिनारच्या तयारीसाठी पुण्यातील सहजयोग्यांबरोबरच संपूर्ण महाराष्ट्रातून सहजयोगी आले आहेत. तसेच हैद्राबाद, कलकत्ता, रांची, राजस्थान, दिल्ली, गुजराथ या राज्यातून देखील सहजयोगी कार्यकर्ते म्हणून आले आहेत. तसेच पुढच्या दोन पूजांमध्ये आपणास स्वयंसेवक म्हणून काम करावयाचेअसल्यास आपली माहिती पाठवावी.आपल्याला सर्व सोयी देण्याचा आमचा सतत प्रयत्न आहे.

संध्याकाळी ६:०० वाजल्या पासूनच स्टेडियममध्ये जाण्यासाठी लोकांच्या रांगा लागल्या होत्या. त्यांना अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आत सोडण्यात येत होते. साधारण ६:३० च्या सुमारास तीन महामंत्रांनी कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यानंतर बनारसहून खास बोलावलेले प्रसिद्ध शहेनाईवादक रोशन अली खॉं आणि सहकारी यांनी शहनाईवादन केले. श्री बागडदे आणि सहकारी यांनी, 'प्रथम तुला वंदितो गजानना गणराया' या भजनाने सुरूवात केली. त्यासुमारास स्टेजसमोरील पडदा दूर करण्यात

आला आणि स्टेजवरील डेकोरेशन सर्वांच्या नजरेला दिसले.त्यामध्ये मागच्या बाजूला गोल पांढऱ्या रंगाचे नक्षीकाम असलेले २०-२५ फुटाचे चार खांब होते. त्याच्या वरच्या बाजूला पक्षी हात जोडून बसलेले व त्यावरून फुलांच्या माळा खाली घरंगळत असल्याचे दिसत होते. पुढच्या बाजूला आणखी चार ७-८ फुटाचे खांब व त्यावरून फुलांच्या माळा खाली घरंगळत होत्या. मागच्या बाजूला मधोमध प.पू.श्रीमाताजी पेटी वाजवीत असल्याचा मोठा फोटो होता. त्याच्या दोन्ही बाजूला वेगवेगळी वाद्ये असलेले आकर्षक फोटो लावले होते.श्रीमाताजींच्या आगमनाच्या जागेवर फुलांच्या माळांची आकर्षक रोषणाई केली होती.मधोमध अत्यंत सुंदर चांदीचे सिंहासन ठेवले होते ते सिहासन उजेडात अत्यंत चकाकत होते. स्टेजच्या उजव्या बाजूला श्रीमाताजी समुद्रावर उभ्या असलेली साधारण ५०-६० फुट लांब व २५ फुट उंच अशी फ्रेम ठेवलेली होती.

साधारण ७:३० च्या सुमारास श्री नलगिरकर यांनी प्रथम श्रीमाताजींनी ख्रिसमस पूजा पुण्यात करण्यास परवानगी दिल्याबद्दल जगातील सर्व सहजयोग्यांच्या वतीने श्रीमाताजींचे शतश: आभार मानले. तसेच ख्रिसमस पूजेसाठी प्रचंड संख्येने जमलेल्या सर्व सहजयोग्यांचे स्वागत करताना सांगितले की, श्रीमाताजींना प्रसन्न, आनंदी करण्यासाठी सर्वांनी जास्तीत जास्त ध्यान केले पाहिजे. मागच्या वर्षाच्या गणपतीपुळे सेमिनारमध्ये सहजयोगी रोज सकाळी तसेच दुपारी तसेच संध्याकाळी सामूहिक ध्यान करीत होते.त्यामुळेच श्रीमाताजी सातही दिवस सेमिनारमध्ये उपस्थित राहिल्या असाव्यात. तरी सर्वांनी या सेमिनारमध्ये जास्तीत जास्त ध्यान करण्यात आपला वेळ घालवावा. सेमिनारमधील सुख-सोयी उपभोगण्यासाठी, पाहण्यासाठी आपण आलेलो नसून सामूहिक कलेक्टिव्हिटीत आपली ध्यानाची स्थिती सुधारण्यासाठी, त्यात आपली प्रगती करण्यासाठी आलो आहोत.त्यामुळे सर्वांनी जास्तीत जास्त ध्यान करा. त्यानंतर स्टेजवरील कार्यक्रमाची सरूवात ७ वर्षाचा चि.सिद्धार्थ याच्या ड्रमवादनाने झाली. त्याच्याबद्दल माहिती सांगताना सर्वात कमी वयाचा ड्रमवादक म्हणून लिमका बुक ऑफ रेकॅार्डमध्ये नोंद, भारतीय गौरव ॲवार्ड ऑफ एक्सलन्स दिल्ली २००३, प्रिंन्स ऑफ रिदम, फिल्म फेस्टिवल मलेशिया २००३, तसेच भारताचे राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या समोर २००४ मध्ये कार्यक्रम झाल्याचे सांगितले.त्याने त्याच्या ड्रमवादनाच्या साधारण ४० मिनिटांच्या कार्यक्रमात सर्वांना मंत्रमुग्ध करून टाकले.

त्यानंतर स्टेजवर धरमशाळा स्कूलच्या मुलांचे कार्यक्रम सुरू झाले. त्यात सुरूवातीला अष्टविनायक महिमा हे सामूहिक नाटक सादर केले. त्यामध्ये महाराष्ट्रातील स्वयंभू असलेल्या अष्टविनायक गणपतीच्या ठिकाणांचा महिमा गात अतिशय प्रभावीपणे ७०-७५ मुलांनी नाटिका सादर केली. शेवटी मागच्या बाजूला आठ कमान्यांमध्ये अष्टविनायकांचे मुखवटे घातलेली मुले व बाजूला सर्व भक्त हा देखावा अतिशय

<u>ख्रिसमस पूजा- प्रतिष्ठान दिनांक २४ डिसेंबर २००४</u>

२४ डिसेंबरच्या रात्री १२:०० च्या सुमारास प्रतिष्ठानमध्ये प.पू.श्रीमाताजींच्या आरामकक्षात ख्रिसमस केक कापण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. प्रतिष्ठान मधील हॅालमध्ये तसेच आदिशक्तीच्या आरामकक्षात रंगीबेरंगी माळांचा वापर करून सजावट केली होती.प.पू.श्रीमाताजी त्यांच्या आरामकक्षात बसलेल्या होत्या. त्यांच्या बाजूला श्री पापाजी, समोरच्या बाजूला सौ साधनादिदि बसलेल्या होत्या.श्रीमाताजींच्या चरणावर श्री राजेंद्र पुगालिया व श्री संदीप गडकरी यांनी जगातील सर्व सहजयोग्यांच्या वतीने फुलांची माळ अर्पण केली. त्यानंतर श्री पुगालिया यांनी श्रीमाताजींना साडीच्या ओटीचे तबक सादर केले. त्यानंतर एक मोठा पांढऱ्या रंगाचा सजविलेला केक श्रीमाताजींच्या समोर परदेशी सहजयोग्यांनी मांडला. बाजूला मेणबत्त्या लावल्या होत्या. श्री पापाजींच्या मदतीने श्रीमाताजींनी केक कापला त्यावेळी कॅरल गीत लावले होते. त्यानंतर दुसरा ब्राऊन रंगाचा केक श्रीमाताजींनी श्री पापाजींच्या मदतीने कापून ख्रिसमस साजरा केला. त्यावेळी जगातील सर्व सहजयोग्यांना श्रीमाताजींनी आशीर्वाद दिले.

मोहक दिसत होता. सदर नाटिका सादर करताना शाळेचे गायक, वादक बाजूला बसून प्रत्यक्ष गात होते.

शिव-तांडव नाटिका सादर करताना पृथ्वीवर सर्वत्र अनाचार माजलेला असल्याने सामान्य नागरिकांना षड् - रिपूंपासून होणारा त्रास दाखविताना सहा काळे कपडे घातलेल्या मुलींच्या रूपात गोलाकार नृत्य करितांना दाखविले. त्यांना नष्ट करण्यासाठी सर्वदेव देवता आपापल्या शक्त्यांचा उपयोग करतात पण षड्रिपू सर्व देवतांनादेखील नेस्तनाबूत करतात. त्यानंतर सर्व देवता शिवाकडे प्रार्थना करतात. यावेळी स्टेजवर प्रत्यक्ष शिवांनी क्रोधित असे तांडव नृत्य केले. त्यांना पार्वतीने नृत्य करून प्रसन्न केले.त्यानंतर शिव शांत होऊन त्यांनी त्रिशूळ पार्वतीकडे दिला. त्यावेळी पार्वतीने शिवांकडे प्रार्थना केली की, '' मला पृथ्वीवर जाऊन षड् रिपूंचा नाश करावयाचा आहे त्यासाठी मला आज्ञा द्या.'' त्यानंतर आदिशक्ती (श्रीमाताजी)ने पृथ्वीवर जन्म घेऊन प्रत्यक्ष लढाई करून नाश केला. ही सामुहिक नृत्य नाटिका सादर करताना सर्वांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

धरमशाळेने शेवटी धनगर नृत्य व मद्रासी क्लासिकल नृत्य एकाच वेळी स्टेजवर सादर करताना त्यांच्यामधील नृत्य स्पर्धा स्टेजवर सादर केली. त्यामध्ये धनगरी नृत्याचे प्रकार मद्रासी पद्धतीने सादर करुन तसेच मद्रासी नृत्य धनगरी पद्धतीने सादर करून सर्वांना हसविले. शेवटी सर्वांनी एकत्र सामूहिक नृत्य करीत अनेक मनोरे सादर केले. सदर नृत्य प्रकार सादर करताना शाळेचे स्टेजवर बसलेले गायक व वादक यांनी सर्वांना प्रभावित केले.

रात्री ९:३० च्या सुमारास प्रसिद्ध शास्त्रीय गायक श्री प्रवीण गांवकर व सहकारी यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरूवातीला, 'वक्रतुंड महाकाय सूर्य कोटी समप्रभ' हे भजन गायले. त्यानंतर 'दर्शन देवो शंकर महादेव' हे भजन गाताना सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवत होते.त्यानंतर 'प्रारंभी स्मरावे देव गणपती कळी काळाची नाही भीती' शेवटी 'विठ्ठल भक्त जमले नाही म्हणे विश्वाची जननी', 'हे आदिशक्ती निर्मल तव चरणके कन कन हम है पार लगा दे हमको मैया तेरी कृपा बिन निर्धार हम है, शेवटी गणराया रे गणराया हे भजन गाऊन त्यांच्या कार्यक्रमांची सांगता केली. त्यावेळी रात्रीचे १०:३० वाजले होते. त्यांचा सत्कार श्री पुगालिया यांनी केला. त्यानंतर स्टेडियमच्या अधिकाऱ्यांचा सत्कार केला.आज श्रीमाताजी जरी साकार रूपात स्टेजवर उपस्थित नसल्या तरी त्यांची निराकार स्वरूपातील उपस्थिती सर्वांना जाणवत होती.

दिनांक २५ डिसेंबर २००४

आजचा पूजेचा दिवस असल्याने स्टेडियमधील सर्वजण रोजच्यापेक्षा लवकर उठून तयारी करीत होते. सकाळचे ध्यान रोजच्या प्रमाणेच झाले. त्यानंतर १०:३० वा. बॅडमिंटन हॉलमध्ये भजनाचे सत्र सुरू झाले. त्याची सुरूवात श्रीबागडदे यांनी 'निर्मला मा भगवती मा', 'गणपती आये सहजीपती' या भजनाने करून सर्वांना आनंदीत केले. त्यानंतर सुब्रमण्यम यांनी शास्त्रीय भजन गायले.धरमशाळेचे शिक्षक श्री अतुल सुंदरकर यांनी, लंगडा लंगडा देवाचा देव बाई लंगडा हे गाणे गायले. कु नर्मदा बोस (धरमशाळा) ने हे मा जगदंबे मा जगतजननी मा हे भजन सादर केले. त्यानंतर नॉयडा ग्रुपचे मुखीमार आणि सहकारी यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी,श्री जगदंबे आइरि मेरी जगदंबे मा, पूजा करे संसार मैया तेरी पूजा करे ही भजने म्हणत सर्व सहजयोग्यांना नाचविले. सौ प्राची भेंडे यांनी बिनती सुनीये आदिशक्ती मेरी या कॅसेट भजनावर भरतनाट्य सादर केले. त्यानंतर मंचर सेंटरच्या मुलीने आईचा जोगवा मागेन जगदंबेचा जोगवा मागेन ह्या गाण्यावर नृत्य सादर केले.

जेजुरी सहजस्कूलच्या १०-१५ मुला-मुलींनी कॅसेटवरील होळी-नृत्य सादर करून सर्वांची वाहवा मिळविली. धरमशाळेच्या ३०-४० मुला-मुलींनी मुझसे तेरी कसम तुझसा कोई नही, अली मोला अली मोला या कव्वाली सादर करून सर्वांना नाचविले. वैतरणा ॲकॅडमीच्या विदेशी विद्यार्थांनी श्री सुब्रमण्यम यांच्या मार्गदर्शनाखाली, निर्मला तोहे दर्शन पाने आया हू तेरे दरबार मे, मा भगवती श्री सरस्वती ही शास्त्रिय भजने म्हटली.त्यानंतर डॉ राजेश यांनी मेरी मा पूनमका चांद हे भजन गाऊन सर्वांना नाचविले.शेवटी श्री व सौ दीपक वर्मा

यांनी जप ले नाम है प्यारा माँ निर्मल का. हे भजन गाऊन सकाळच्या सत्राचा कार्यक्रम संपला तेव्हा दुपारचे १:०० वाजून गेले होते.

मुख्य स्टेडियममध्ये ५.३० च्या सुमारास सर्वांना सोडण्यात येते होते. साधारण ६:३० च्या सुमारास तीन महामंत्रांनी कार्यक्रमाची सुरूवात झाली. सुरूवातीला डॉ तलवाल यांनी, तुम बैठी रहो चितवन मे, जागो कुंडलिनी मॉ करो सबपे कृपा ही भजने म्हटली. त्यानंतर स्क्रीनवर ख्रिसमस पूजा २००३ ची व्ही.डी.ओ.सी.डी. दाखविण्यात आली.त्यानंतर डॉ राजेश यांनी, आया मसिदा प्यार मसिढा माँ निर्मल का, हे भजन म्हटले त्यानंतर रात्री ७.४५ च्या सुमारास श्रीमाताजींचे स्टेडियममध्ये आगमन झाले त्यावेळी त्यांच्या गाडीच्या समोर दोन्ही बाजूना मोठया प्रमाणावर आतषबाजी चालू होती. त्यांचे स्टेजवर प्रत्यक्ष आगमन झाले आणि श्रीमाताजींच्या साकार रूपाचे दर्शन झाल्याने स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या सर्वांच्या डोळ्याचे पारणे फिटले. श्रीमाताजींची दोन महिलांनी सर्व जमलेल्या सहजयोग्यांच्या वतीने आरती केली. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर विदेशी सहजयोग्यांनी पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजींची चरण-पूजा लहान मुलांनी केली.पूजा चालू असताना हेमजा सुतमं भजे गणेश मिश नंदनम, जागो सवेरा आया है, ए गिरी नंदीनी, जगी तारक जन्मा आला ही भजने म्हटली. काही क्षणात आदिशक्ती श्री माताजींचे पूजेतील दर्शन झाले. शेवटी जगातील लिडर्सनी आरती केली. त्यानंतर मरणच मेले प्रभू माझे विजयी झाले हे भजन झाले.त्यानंतर ९:१० च्या सुमारास श्रीमाताजींचे सगुणरूपी प्रस्थान त्यांच्या निवासस्थानाकडे झाले. सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवत होते. स्टेजवर असलेल्या आदिशक्तीच्या निर्गुण चैतन्याचे दर्शन घेण्यासाठी सहजयोग्यांची झुंबड उडाली होती.बाहेरच्या बाजूला प्रसादाची शिस्तबद्ध व्यवस्था केली होती.

दिनांक २६ डिसेंबर २००४

दिवसाची सुरूवात सकाळच्या सामूहिक ध्यानाने झाली.त्यानंतर बॅडमिंटन हॉलमध्ये सकाळच्या कार्यक्रमाची सुरूवात ११.०० वा श्री बागडदे यांच्या, जय गणपती वंदन गणनायक या भजनाने झाली. त्यानंतर ज्यांची संध्याकाळी लग्ने होणार आहेत अशा नवीन वधू- वरांना स्टेजवर बोलवून त्यांना माईकवर बोलण्यास सांगितले. त्यानंतर श्री वर्मा यांनी, तुम बसी हो कन कन मे हे भजन म्हटले. शेवटी डॉ राजेश गायला बसले त्यांनी, मेरी माँ पूनम का चाँद या भजनावर सर्व उपस्थितांना नाचवले. संध्याकाळी याच हॉलमध्ये लग्ने होणार असल्याने तयारी करण्यासाठी हॉल रिकामा करावयाचा असल्याने हॉल खाली करावयास सांगितला.

त्यानंतर नाशिकचे श्री शुक्ला, श्री महेश मोकाशी यांच्या मार्गदर्शनाखाली लग्नाची तयारी शिस्तबद्ध पद्धतीने सुरू झाली.त्यांनी सर्वत्र हवनाची तयारी करताना प्रत्येक हवनाशेजारी आवश्यक असलेल्या सर्व साहित्यासह मांडामांड केली होती. मधोमध सर्व जोडप्यांना दोन रांगेत उभे राहण्यासाठी अंतरपाट त्यावर स्वस्तिक-क्रॉस काढून तयार ठेवले होते. वधूंना व वरांना एकमेकांच्या गळ्यात घालण्यासाठी फुलांच्या माळा ठेवलेल्या होत्या.हॉल लहान असल्याने फक्त वधू-वरांचे नातलगांनाच हॉलमध्ये सोडण्यात येत होते.हॉलबाहेर सहजयोग्यांना बसण्यासाठी व्यवस्था केली होती.

श्रीमाताजींच्या आगमनाच्या रस्त्यावर दुतर्फा पांढऱ्या साडया घालून सुवासिनी नारळाच्या वाटयांमध्ये तेलाचे दिवे घेऊन उभ्या होत्या. साधारण ५:३० च्या सुमारास नवरदेव व वधू नटून हॉलमध्ये प्रवेश करावयास लागले. नवरदेवांना हॉलच्या खालच्या बाजूला असलेल्या स्टेजसमोरील जागेत तर नववधूंना वरच्या बाजूला असलेल्या स्टेजसमोरील जागेत त्यांच्या नंबर नुसार बसविण्यात येत होते.त्यानंतर ६:३० च्या सुमारास समोर ठेवलेल्या टी.व्ही.वर श्रीमाताजींची नवरदेवांना मार्गदर्शन करणारी १५-२० मिनिटांची कॅसेट लावण्यात आली. त्यानंतर प्रथम नवरदेवांना रांगेतून त्यांच्या समोर असलेल्या स्टेजवरील श्रीमाताजींच्या निराकार फोटोचे दर्शन श्री नलगिरकर यांच्या मार्गदर्शनात देण्यात येत होते.

त्यानंतर ७:०० च्या सुमारास नववधूला मार्गदर्शन करणारी कॅसेट टी.व्ही.वर दाखविण्यात आली. त्यानंतर नववधूंनी रांगेतून श्रीमाताजींच्या निराकार चरण कमलावर

फुले वाहून गौरी पूजा केली.त्यानंतर सर्व नववधूंना हातात धरण्यासाठी पुष्पमाला देऊन अंतरपाटासमोर नंबरवर उभे करण्यात येत होते.तसेच दुसऱ्या बाजूला नवरदेवांना हातात धरण्यासाठी पुष्पमाला देऊन अंतरपाटासमोर बरोबर त्यांच्या नंबर समोर उभे करण्यात येत होते.त्यानंतर सर्वांना अक्षता वाटण्यात आल्या. त्यानंतर श्रीबागडदे आणि सहकारी यांनी सहजयोगाच्या मंगलाष्टका म्हटल्या त्यानंतर नवरदेव-नववधूंनी एकमेकांना पुष्पमाला घातल्या आणि सर्वांनी टाळ्या वाजविल्या. त्यानंतरचे विधी, सहजयोगाची शपथ घेणे,गाठ बांधणे, कन्यादान, लाजा होम, सप्तपदी, इत्यादी सर्व प.पू,.श्रीमाताजींच्या निराकार आशीर्वादात श्री नलगिरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

नवीन जोडप्यांनी जोडीने रांगेत श्रीमाताजींच्या निराकार चरणाचे दर्शन घेतले. त्यावेळी प्रत्येक जोडप्यांना श्रीमाताजींच्या कृपेत चांदीची भांडी प्रेझेंट देण्यात आली. त्यानंतर सर्व जोडयांना बसविण्यात आले. प्रत्येकाला जेवणाचे ताट देण्यात आले. त्यानंतर एकमेकांना घास भरविण्याचा कार्यक्रम पार पडला. शेवटी श्री बागडदे आणि सहकारी कव्वाली गायला बसले. त्यांनी, मेरी माता का करम व दिलमे दिदार की आरजु है या दोन कव्वाल्या म्हणत उपस्थित सर्व जोडप्यांसह सर्वांना नाचविले. शेवटी श्री राजेंद्र पुगालिया यांचे स्टेजवर आगमन झाले. सर्व नवरदेव-नववधू यांना प्रतिष्ठानवर श्रीमाताजींच्या प्रत्यक्ष दर्शनासाठी घेऊन जाणार असल्याचे जाहीर करताच सर्व जोडपी आनंदी झाली.सदर सेमिनार पार पाडण्यासाठी ज्यांनी कामे केली अशा सर्व कार्यकर्त्यांचे जाहीर कौतुक करताना सांगितले की, मोठमोठे अधिकारी पदावर असलेले, प्रतिष्ठित डॉक्टर्स, वकील, प्राध्यापक बिझनेसमन यांनी सेमिनारमध्ये त्यांना नेमून दिलेले काम श्रीमाताजींचे समजून पार पाडले त्याबद्दल सर्वांचे आभार मानले. सेमिनारसाठी अपेक्षेपेक्षा जास्त सहजयोगी जरी जमले असले तरी श्रीमाताजींच्या कृपेत सर्व कमिटींच्या कार्यकर्त्यांच्या रात्रदिवस राहण्याची तसेच पाण्याची व इतर सर्व सोयींची व्यवस्था करणाऱ्या कार्यकर्त्यांचे कौतुक केले आणि सेमिनार संपल्याचे जाहीर केले.

या वर्षाच्या ह्या ख्रिसमस पूजेसाठी जगातून तसेच भारतातून सर्व प्रांतांतून सहजयोगी प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित होते. अपेक्षेपेक्षा आयत्यावेळी जास्त आलेल्या सहजयोग्यांना राहाण्यासाठी अगोदर २-३ दिवसांच्या तयारीतच झालेल्या सोयी व व्यवस्था ही केवळ आदिशक्ती प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवीयांच्या कृपाशीर्वादामुळेच झाली.

जय श्रीमाताजी.

● ● ●

## वधू-वरांना प.पू.श्रीमाताजींचे आशीर्वाद

### प्रतिष्ठान दिनांक २६,डिसेंबर २००४

दिनांक २६ डिसेंबर २००४ रोजी बालेवाडीत संपन्न झालेल्या लग्न सोहळ्यानंतर सर्व वधु-वरांना आशीर्वाद देण्यासाठी रात्री ९:०० च्या सुमारास प्रतिष्ठानवर आणण्यात आले होते. त्यावेळी श्रीमाताजी त्यांच्या आरामकक्षात कोचावर बसलेल्या होत्या. त्यांच्या उजव्या बाजूला श्री पापाजी, व डाव्या बाजूला सौ साधनादिदि बसलेल्या होत्या. श्रीमाताजींच्या चरणांवर श्री राजेंद्र पुगालिया व श्री नलगिरकर यांनी फुलांचा हार अर्पण केला.त्यानंतर ४-४ जोडप्यांना श्रीमाताजींच्या चरणांवर शिस्तबद्धरीतीने बोलवण्यात येत होते. श्रीमाताजींच्या चरणावर दर्शन घेताना त्या नवदांपत्यांची गोंधळून धांदल उडत होती. कोणाची टोपी पडत होती तर कोणाचे बाशिंग निसटत होते. प्रत्येक नव वधू -वरांना श्रीमाताजी अत्यंत प्रेमळपणे पाहात होत्या. त्यांना आशीर्वाद देताना त्यांच्या टोप्या नीट करण्याच्या सूचना देत होत्या.

हा नव वधू-वरांच्या दर्शनाचा कार्यक्रम साधारण तासभर चालू होता. पहिली ४ जोडपी गेली की दुसरी ४ जोडपी बोलविण्यात येत होती. सर्व जोडप्यांना श्रीमाताजींच्या चरणावर आशीर्वादीत करण्याचा कार्यक्रम श्रीमती सुधादिदि यांच्या मार्गदर्शनात पार पडला. आज श्रीमाताजी अत्यंत प्रसन्न, आनंदी व खुश होत्या.

# सहज समाचार

✤ पब्लिक प्रोग्राम - भोसरी,पुणे

प.पू.श्रीमाताजींच्या कृपेत दिनांक ३० नोहेंबर २००४ रोजी दुपारी ४:०० च्या सुमारास लांडेवाडी चौकात आमदार श्री विलास लांडे यांच्या हस्ते श्रीमाताजींच्या फोटोला हार घालून मिरवणुकीची सुरूवात झाली.ती दिल्ली रोड, शाहू चौक, संभाजी नगर, आळंदी रोड या मार्गाने शेवट कार्यक्रमाच्या ठिकाणी झाला. मिरवणुकीच्या सरुवातीला ढोल-लेझीम पथक होते ट्रॅक्टरवर श्रीमाताजींचे भव्य कट आऊट लावलेले होते. मागच्या बाजूला पुणे परिसरातील सहजयोगी शिस्तीत चालत होते. सदर मिरवणुकीची शिस्त व शोभा पाहून नागरिक पब्लिक प्रोग्रामसाठी येण्यास प्रभावीत होत होते.

इकडे कार्यक्रमाच्या ठिकाणी भोसरीतील राम स्मृति मंगल कार्यालयात सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत प्रदर्शन भरविले होते. त्याठिकाणी संध्याकाळी पब्लिक प्रोग्राम झाला. त्यामध्ये सौ पित्रे व श्री निंबाळकर दादा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन देऊन जागृती दिली. त्यावेळी साधारण २००० जण उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता श्री राजीव बागडदे यांच्या भजनाने झाली.

✤ सहजयोगाचा अभूतपूर्व कार्यक्रम- सातारा

. १६ जानेवारी २००५ रोजी सातारा शहरात पब्लिक प्रोग्रामचे आयोजन केले होते. सातारा या ऐतिहासिक व प्राचीन शहरात यापूर्वी अनेक कार्यक्रम झाले असतील पण प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींच्या कृपेत हा कार्यक्रम सर्वांवर चैतन्याच्या प्रचंड वर्षावाचा झाला.

कार्यक्रमाची तयारी युवाशक्तीने ८ दिवस अगोदरपासूनच केली होती. घराघरातून पत्रके वाटण्यात आली. तसेच चौका चौकातून प.पू.श्रीमाताजींचे प्रसन्न मोठ मोठे कटआऊट विद्युतरोशणाईसह लावले होते.तसेच प.पू.श्रीमाताजींची भव्य पोस्टर्स लावण्यात आली होती. त्यामुळें कार्यक्रमाच्या भव्य स्वरूपाची जाणीव साताऱ्यातील जनतेला झाली होती.

कार्यक्रमाच्या दिवशी दुपारी २:३० वा. प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींच्या प्रतिमेची मिरवणूक सुरू झाली. सुंदर सजविलेल्या सुशोभित रथातून तसेच हत्तीच्या अंबारीतून व सजविलेल्या पालखीतून चरणपादुका ठेवण्यात आल्या होत्या. मिरवणुकीच्या सर्वात पुढे ढोल-ताशा तसेच विविध वाद्य; लेझीम शोभा यात्रा, पालखीच्या मागे सजविलेल्या ट्रॅक्टर वर साधुसंत, ऋषि-मुनी, देव देवता व राष्ट्र पुरुषांच्या वेशभूषेत, युवाशक्तीचे कलावंत परिसरातील जनतेचे चित्त वेधून घेत होते. साताऱ्याच्या मुख्य रस्त्यावरून निघालेल्या या भव्य मिरवणुकीत सुमारे ३००० सहजयोगी सहभागी होते. प.पू.श्रीमाताजींच्या अमृततुल्य संदेषांची घोषवाक्य देत मिरवणूक संपूर्ण शहराच्या प्रमुख रस्त्यावरून जल्लोष व जयजयकार करत चालली होती. अशा विविध प्रकारे नटलेल्या वेशभूषेतील तसेच फेटा घातलेले युवा मावळे होते. ही मिरवणूक साधारण ३-३० तास चालली होती.

कोटेश्वर मंदिराच्या भव्य प्रांगणात ६:३० वाजता मिरवणुकीची सांगता झाली. त्यावेळेस फटाक्यांची शोभेच्या दारूची आतशबाजी झाली. आकर्षक रंगीबेरंगी, विविध फुलांनी सजविलेल्या भव्य व्यासपीठावर प.पू.श्रीमाताजींच्या चैतन्य प्रतिमेचे आगमन झाले व त्या सिहासनावर विराजमान झाल्या. दिल्लीचे सुप्रसिद्ध गायक डॉ राजेश यांनी श्रीगणेशाच्या भजनाने कार्यक्रमाची सुरूवात केली.सुरवातीला श्री महेश पवार यांनी सर्वांचे स्वागत केले, श्री केंजळे यांनी दीपप्रज्वलन केले, प्रो.अशोक चव्हाण यांनी श्रीमाताजींच्या प्रतिमेला हार घालून कार्यक्रमाची सरूवात करताना त्यांनी सांगितले की, परमेश्वराचे अस्तित्व कुणी मानो अथवा न मानो परंतु देव होता आहे आणि राहणारच. परमेश्वराचे अनुभूती न घेता विधान करणं हे अज्ञानाचे लक्षण होय.प्रसिद्धीची हौस असलेल्या काही मंडळींना विरोध करणे यातच मोठेपणा वाटतो. परंतु सुज्ञ जनता त्यांना किंमत देत नाही हे तितकेच खरे.

सत्य कुणीही दाबू शकत नाही. सत्य हे तेजस्वी असते. ते प्रगट होणारच. प्रत्येक ठिकाणी शंका घेणाऱ्या व्यक्तींविषयी बोलताना ते म्हणाले, शंका घेणारी मंडळी जन्माला आलीच कशी? हीच सदैव मोठी शंका आहे. अशा प्रकारे सडेतोड उत्तर देऊन जमलेल्या साधारण १५०-२०० पोलिसांना व वरिष्ठ अधिकाऱ्यांना जागृती दिली. तसेच सर्व पत्रकार व वाहिन्यांना त्यांच्या शंकांना उत्तरे देत माहिती व मुलाखत दिली. सहजयोगाचे माहात्म्य विषद करताना प्रा चव्हाण म्हणाले, प्रत्येक अवतरणाला साधुसंतांना, ऋषीमुनींना न ओळखण्याची चूक मानवाने केलेली आहे. कारण आत्म्याला प्रकाश नव्हता. परंतु श्रीमाताजींनी कुण्डलिनी शक्तीच्या जागृतीने आत्म्याला प्रकाश दिला व चित्त तेजस्वी केले. त्यामुळे सत्य-असत्य, चांगले-वाईट, सज्जन -दुर्जन, यातील फरक उमगतो. म्हणूनच मानवी जीवनाला श्रीमाताजींनी आत्मसाक्षात्कारासारखी अमूल्य देणगी, बहाल केलेली असून सर्व धर्मांचा आदर करणारा सहजयोग हा प्रत्यक्ष अनुभूती घेण्याचा डोळस योग आहे. तसेच त्यांनी सहजयोगाचे सर्व फायदे तसेच चक्रांची माहिती दिली. त्यानंतर प.पू. श्रीमाताजींच्या कृपेत जमलेल्या २०,००० लोकांना आत्मसाक्षात्कार देण्यात आला.

✤ <u>स्वच्छता अभियानाद्वारे सहजयोगाचा प्रसार -चंद्रपूर जिल्हा</u>

दि. १६ जानेवारी ते २३ जानेवारी २००५ या कालावधीत चंद्रपूर जिल्हा सहजयोग केंद्र मुख्य सेंटर (जिल्हा स्टेडियम) लगतचा परिसर, रस्ते, नाले, स्वच्छ करण्यात आले यामध्ये ५००-६०० सहजयोग्यांनी सहभाग घेतला होता. तसेच सिंदेवाही, वरोरा, राजुरा, भद्रावती, तालुक्यातील सहजयोग ध्यान केंद्रे व उपकेंद्रे यांनीदेखील स्वच्छता अभियान केले होते. सदर अभियानाद्वारे चंद्रपुर जिल्ह्यातील सर्वांचे लक्ष सहजयोगाकडे आपाआपच गेले. सदर अभियानाचे कौतुक सर्व स्थानिक वृत्तपत्रातून झाल्याने सहजयोगाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. सहजयोग प्रसार व प्रचार करण्यासाठी हा एक चांगला उपक्रम असल्याचे चंद्रपूर जिल्ह्यामध्ये दिसून आले. तसेच १४ जाने. सार्वजनिक हळदिकुंकवाचा कार्यक्रम आयोजीत करताना त्यामध्ये ख्रिसमस पूजेत धरमशाळेतील मुलांनी सादर केलेला कार्यक्रम सादर करून सर्व सहजयोग्यांना ख्रिसमस पूजेची आठवण करुन दिली. तसेच स्वच्छता मोहीम व हळदीकुंकू या कार्यक्रमासोबत सांस्कृतिक कार्यक्रमात वक्तृत्व स्पर्धा, नृत्य स्पर्धा, रांगोळी व गायन स्पर्धा आयोजीत करून सर्वांना त्यांच्या कलांना प्रोत्साहन देण्यात आले. त्याचा बक्षीस समारंभ दिनांक ६.२.२००५ रोजी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

✤ <u>पब्लिक प्रोग्राम - नारायणगांव</u>

रविवार दि. २३.१.२००५ रोजी नारायणगाव मंगल कार्यालयात भव्य असा पब्लिक प्रोग्राम आयोजीत केला गेला. यामध्ये नारायणगाव परिसरातील व जुन्नर तालुक्यातील ४००० ते ४५०० नवीन साधकांनी उपस्थित राहून जागृती घेतली. दुसऱ्या व तिसऱ्या दिवसाच्या फॉलोअपला १०० ते १५० लोक उपस्थित होते. या पब्लिक प्रोग्रामसाठी अनेक जेष्ठ सहजयोगी उपस्थित होते. श्रीरामपूरच्या युवाशक्तीने एक दिवस अगोदर नारायणगाव व परिसरात येऊन घरोघरी पत्रकाचे वाटप केले. त्यांचे सहकार्य चांगले लाभले. राजीव बागडदे व त्यांचा सर्व मुझिक ग्रुप कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहिला.

कार्यक्रमाची सरूवात श्री राजीव बागडदे यांच्या गायनाने झाली. त्यांनी चार-पाच भजने गाऊन वातावरणाची निर्मिती केली. त्यानंतर श्री. ए.बी. गायकवाड यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. नंतर डॉ. हुले यांनी सहजयोगाचा परिचय करून दिला. प्रा. अशोक चव्हाण यांनी चक्र, देवदेवता संतुलन व सहजयोगाचे फायदे याची माहिती दिली. शेवटी श्री दिलीप नलगिरकर यांनी सर्व उपस्थितांना जागृती दिली. आभार श्री गायकवाड ए.बी. यांनी मानले.

या कार्यक्रमास विशेष उपस्थिती नारायणगांव पोलिस स्टेशनचे एपीआय श्री कदम साहेब होते. त्यांनी सहजयोगामध्ये सर्वधर्मसमभाव कसा आहे? सहजयोग सध्याच्या काळात कसा करणे गरजेचे आहे याची आवश्यकता पटवून दिली. सर्व कार्यक्रम झाल्यानंतर शेवटी फक्त सहजयोग्यांसाठी श्री नलगीरकर यांनी सहजयोग प्रसार व प्रचार करण्याची गरज पटवून मार्गदर्शन केले.

## श्री निर्मलस्तवन

१ आलो तुला मी शरण श्री निर्मला माते
तुज विनवितो अंत:स्वरानी
भव दु:खे माझे कथू मी कुणाला
तू पार कर माते(श्री निर्मला माते ) या बालकाला।

२ तू आदिशक्ती वरदा भवानी
तू अन्नपूर्णा अकुला कुंडलिनी
ममताच माते तू याजगाला
तू पार कर माते (श्री निर्मला माते)या बालकाला

३ तू निरहंकार : निर्विकार नित्या
तू महाशक्ती : महामाया तूच लज्जा
तू निर्गुणा निर्मोहा तू निर्मला
तू पार कर माते (श्री निर्मला माते) या बालकाला

४ गळू दे अहंकार क्षणी याच माते
लागो मला वेड तव ध्यानाचे
देई मला ठाव तुझीया पदाला
तू पार कर माते (श्री निर्मला माते) या बालकाला

५ मन चंचल धावे वेगळे
जे जे वांछियले ते ते मिळाले
तरी पडतो मोह या जिवाला
तू पार कर माते (श्री निर्मला माते) या बालकाला

६ ज्याच्या मनी जैसा भाव
त्यासाठी तू घेशी धांव
लागो मन माझे तुझीया ध्यानाला
तू पार कर माते (श्री निर्मला माते) या बालकाला

७ जरी घार उडे आकाशी
परी लक्ष असे पिल्लांपाशी
तसे तू पाळीशी या विश्वाला
तू पार कर माते (श्री निर्मला माते) या बालकाला

८ तूंच माझ्यातीलं आत्मा
तूंच सर्वव्यापी परमात्मा
तूंच चालविशी या विश्वाला
तू पार कर माते (श्री निर्मला माते) या बालकाला

९ तू महालक्ष्मी महासरस्वती महाकाली
तुच साक्षात नारायण ब्रह्म महेश
स्वयं श्री गणेश पुजे तुजला
तू पार कर माते (श्री निर्मला माते) या बालकाला

१० वंदीन तें तें तव चरण व्हावे
स्मरीन तें रूप तुझे दिसावे
राहू दे चित्त सदा तव चरणाला
तू पार कर माते (श्री निर्मला माते) या बालकाला

प्रकाश दळवी, पुणे

---

श्री माताजी आप हमारे
दिलमे अधिष्ठित होना ॥
प्रकाश देना आत्मा को
चैतन्यलहरी बहा देना ॥ श्रीमाताजी
आत्मा है हम श्रीमाताजी
पूर्णत: निर्दोष है ॥
सब अपने ही है जगत मे
ना किसपर अब रोष है ॥
श्रीमाताजी हम बच्चों को
निर्मलविद्या समझाना ॥ श्रीमाताजी
सबको हमने क्षमा की है
स्वयं को भी माफ किया ।
बीते दिनभी परछाई को
दिलसे धुलकर साफ किया ॥
श्रीमाताजी अहंकारमे
कृपया संतुलन लाना ॥ श्रीमाताजी
माँ अगर भूल हुई हमसे तो
कृपया आप क्षमा करना ॥
श्रीमाताजी चित्त हमारा
चैतन्य मे लीन करना ॥
श्रीमाताजी आप हमारे
सहस्रारमे आ जाना ॥
साक्षात्कार स्थापिये हममे ।
निर्विचारता दे देना ॥ श्रीमाताजी

.... कल्याणी तुंगारे

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥

## हवन, २४ डिसेंबर २००४









## विवाह समारंभ, २६ डिसेंबर २००४









# म्युझिक प्रोग्राम, डिसेंबर २००४, पुणे.








